स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत मानव्य विज्ञान विद्याशाखेअंतर्गत तत्त्वज्ञान विषयातील **Ph. D.** पदवीसाठी सादर करावयाचा शोध आराखडा

शोधप्रबंधाचा विषय

भारतीय आस्तिक दर्शनातील ईश्वर संकल्पना

संशोधक

दिवे वैशाली माधवराव

मार्गदर्शक

डॉ. सुनील साळुंके

तत्तवज्ञान विभाग प्रमुख,

दयानंद कला महाविद्यालय, लातूर

भारतीय आस्तिक दर्शनातील ईश्वर संकल्पना

प्रस्तावना

मानव हा पृथ्वीतलावरील सर्वात श्रेष्ठ प्राणी आहे. यामुळे आपल्या सभोवतालचे जग जाणण्याची इच्छाही प्रत्येकाच्या मनात असते जिज्ञासेतून सर्व ज्ञानाचा उगम होतो. मनुष्य हा विचारशील प्राणी आहे. त्यामुळे त्याला ज्या गोष्टी अज्ञात आहेत. त्या जाणून घेण्याचा तो प्रयत्न करतो. भोवतालचे जग जाणणे म्हणजेच ज्ञान प्राप्त करून घेणे होय. विश्वाचे स्वरूप जाणून घेण्याचा प्रयत्न केला जातो. त्याला तत्त्वज्ञान असे म्हणतात मनुष्य हा कुठलाही असा विचार करणे हा त्याचा स्वभाव आहे. त्याचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन भिन्नभिन्न स्वरूपाचा असतो त्यामुळे देशाचे, धर्माचे, पंथाचे, संस्कृतीचे तत्त्वज्ञान हे वेगवेगळे असते.

तत्त्वज्ञान म्हणजे काय?

'तत्त्वज्ञान' हा एक सामाजिक शब्द असून तो 'तत्व' आणि 'ज्ञान' या दोन शब्दांपासून बनला आहे. यातील 'तत्त्व' हा शब्द 'तत्' आणि 'त्व' या दोन शब्दांच्या संधीतून तयार झाला आहे 'तत्' या शब्दाचा अर्थ ते it असा असून 'त्व' हा शब्द 'पणा' किंवा 'ता' (ness) या अर्थाने आला आहे. यावरून 'तत्व' या शब्दाचा शब्दशः अर्थ 'तत्पणा' 'तत्ता' किंवा 'तेपणा'' (it ness) असा होतो त्याचे भाववाचक नाम तयार होते.

ज्याप्रमाणे मराठीतील 'तत्त्वज्ञान' या शब्दाची फोड केली आहे. त्याप्रमाणे इंग्रजी भाषेत 'Philosophy' या शब्दाची फोड केली आहे. मराठीतील तत्त्वज्ञान या शब्दाकरिता इंग्रजी भाषेत 'Philosophy' हा समानार्थी शब्द आहे. 'फिलॉसॉफी' हा शब्द दोन ग्रीक शब्दांच्या एकत्रीकरणातून तयार झाला आहे. ते म्हणजे 'फिलॉस' (Philos) आणि 'सोफिया' (Sophia). 'फिलॉस' या शब्दाचा अर्थ 'प्रेम' किंवा

'अनुराग' आणि 'सोफिया' या शब्दाचा अर्थ 'शहाणपण किंवा ज्ञान' असा होतो. यावरून 'फिलॉसॉफी' या शब्दाचा 'ज्ञानाविषयीचे प्रेम' (Love of Wisdom) असा करण्यात येतो. याचाच अर्थ असा होईल की तत्त्वज्ञान म्हणजे ज्ञान प्राप्त करण्याची इच्छा.

तत्त्वज्ञान या शब्दाकरिता भारतीय भाषांमध्ये दर्शन हा शब्द उपयोजिण्यात येतो. दर्शन या शब्दाची उत्पत्ती संस्कृत भाषेतील 'दृश' या धातुस अन् हा प्रत्यय जोडून झाली आहे. 'दर्शन' या शब्दाचा साधा सरळ अर्थ म्हणजे पाहणे असा होतो. पाहण्याची क्रिया डोळ्यांनी घडते तिला आपण दृष्टी म्हणतो परंतु 'दर्शन' शब्दाचा अर्थ पाहणे किंवा दृष्टी असा करण्यात येत नसून ज्ञानदृष्टी असा करण्यात येतो. कारण भारतीय संदर्भात तत्त्वज्ञानाचे उद्दिष्ट अंतिम सत्य असणाऱ्या तत्त्वांचा शोध घेणे हे आहे. म्हणून दर्शन या शब्दाचा अर्थ अंतिम मूलभूत तत्त्वाचे ज्ञान करून देणारे शास्त्र असा करण्यात येतो.

भारतीय दर्शने 9 असून ती पुढील प्रमाणे आहेत

१ चार्वाक दर्शन, 2 जैन दर्शन, 3 बौद्ध दर्शन, 4 सांख्यदर्शन, 5 योगदर्शन, 6 न्याय दर्शन, 7 वैशेषिक दर्शन, 8 मीमांसा दर्शन, 9 वेदांत दर्शन.

या नऊ दर्शनाला आस्तिक आणि नास्तिक अशा दोन विभागात विभागले गेले आहे.

आस्तिक दर्शन म्हणजे वेद प्रामाण्य मान्य करणारे दर्शने होत. यात सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, मीमांसा आणि वेदांत या दर्शनाचा समावेश होतो. तर नास्तिक दर्शन म्हणजे जे वेद प्रामाण्य अमान्य करतात अशी दर्शने होत यामध्ये चार्वाक, जैन व बौद्ध या दर्शनाचा समावेश होतो.

या दर्शनामध्ये अनेक विषयाबरोबर ईश्वर सृष्टी, मन, बुद्धी, शरीर, द्रव्य, पदार्थ कारणकार्य संबंध, तर्क व अनेक विषयांचा अभ्यास केलेला

आढळतो. ईश्वर याविषयी काहींनी सकारात्मक तर काहींनी नकारात्मक चिंतन केलेले आढळते. काही दर्शनांने ईश्वराचे अस्तित्व सिध्द करण्यासाठी तर काहींनी ईश्वराचे अस्तित्व नाकारण्यासाठी चिंतन केलेले आढळते. जी दर्शने ईश्वराचे अस्तित्व मानतात ती ईश्वरवादी आणि जी दर्शने ईश्वराचे अस्तित्व अमान्य करतात ती निरीश्वरवादी दर्शनी होत.

ईश्वराचा अर्थ

'ईश्वर' या शब्दात 'ईश' हा धातू त्याचा अर्थ 'नियंत्रण करणे, सत्ता चालविणे, अश व्यापून राहणे या धातूपासून ईश्वर शब्द बनला आहे. अखिल विश्वाचा कर्ता–धर्ता, संहर्ता, नियंता, ज्ञान व चैतन्याचे अधिष्ठान सर्वांत योगी देव, परमप्रभूची कल्पना ईश्वर संज्ञेत अभिप्रेत आहे. उपनिषदात ब्रहमन्, आत्मन् संकल्पना 'निर्गुण निराकार' या वर्गात येतात. 'ताओ' धर्म ही कल्पना मानतो यहुदी यहोबा, ख्रिश्चन GOD, इस्लाम अल्लाह, झरतुष्टी अहुर मझदा. या ईश्वर कल्पना सगुण निराकार या प्रकारे त्यांनी ईश्वर प्रतीक अथवा साकार ईश्वर प्रतिमा स्वीकारलेली नाही. त्यांच्यामध्ये सर्वज्ञे, सर्वशक्तीमान, परमदयाळू, परमन्यायी अशी परमेश्वर कल्पना दिसून येते. हिंदू धर्मातील विविध धर्म संप्रदायानी सगुण साकार ईश्वरी प्रतीके व प्रतिमा मान्य केलेल्या दिसतात सगुण निराकार व निर्गुण निराकार या विकसित धर्मदायी च्या अवस्था मानल्या जातात.

विज्ञानातील दूहवाद व मानवतावाद यात संप्रदायनिष्ठ ईश्वर संकल्पना अमान्य केली आहे त्यांनी ईश्वर निरपेक्ष धर्म स्वीकारलेला आहे.

संशोधनाची उद्दिष्ट किंवा उद्देश

ईश्वर हा प्रत्येकाच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. प्राचीन मानवाची अशी धारणा होती की या सृष्टीचे व मानवाच्या जीवन व्यापाराचे नियंत्रण

करणारी शक्ती या सृष्टीमध्ये विश्वामध्ये असते. जी अदृश्य अलौकिक स्वरूपाची आहे या शक्तीचे ज्ञान सामान्य माणसाला प्रत्यक्ष होऊ शकत नाही. त्या शक्तीला 'ईश्वर' ही संकल्पना देण्यात आली आहे. ही शक्ती या सृष्टीच्या उत्पत्ती, स्थिती व लय याचे कारण आहे. मानवाच्या कर्मफलाचा दाता हा ईश्वर आहे.

ईश्वर कोण कोठे व कसा आहे हा प्रश्न प्रत्येक मानवाला पडतो. मानवाच्या धार्मिक जीवनाचा इतिहास हा प्रदीर्घ आहे. प्रत्येक भारतीय दर्शनांमध्ये ईश्वर विषयक विचार मांडण्यात आले आहेत. मात्र सर्वांच्या विचारात एकता किंवा एकसारखेपणा आढळून येत नाही. चार्वाक मत हे ईश्वर कल्पने विरुद्ध उघड उघड बंड करण्यासच बद्धपरिकर आहे बौद्ध, जैन, सांख्य आणि बहुसंख्य मीमांसक यांनाही सृष्टीकर्त्या ईश्वराचे अस्तित्व मान्य नाही. वैशेषिक दर्शन हे ईश्वराविषयी मुग्ध आहे. योगात ईश्वर मानले आहे पण त्याचे स्थान दुय्यम आहे. ईश्वरप्रणिधान नावाचा जो नियम योग दर्शनात सांगितला आहे त्याचे फल ईश्वर प्राप्ती नसून चित्तवृत्तीविरोध हे आहे. चित्तवृत्तीविरोधाचे एक साधन म्हणून ईश्वरप्रणिधान नियम आचारावयाचा ईश्वरी साध्य नव्हे चित्तविरोध हे साध्य होय.

अद्वैत वेदांताने ईश्वर मानला आहे पण तो अंतिमतः सत्य नाही. मायेमुळे त्याला अस्तित्व आले आहे तो औपाधिक आहे अद्वैत वेदांताने सगुण ईश्वर मानला असला तरी निर्गुण ब्रह्माच्या अपेक्षेने ईश्वराचे स्थान त्याने गौण ठरवले आहे. न्याय दर्शनाने मात्र सृष्टीला उत्पन्न करणाऱ्या आणि परमकारणिक एक अशा ईश्वराच्या अस्तित्वाची सिद्धी करण्यासाठी अतिशय कुशलतेने अनुमानाची मांडणी केली आहे. पण ईश्वर भक्तीची उत्कटता जाणवते ती रामानुजीय माध्व, वल्लभ यासारख्या वैष्णव दर्शनातूनच अज्ञात ईश्वरी सत्तेचा वेध माणसाची प्रज्ञा युगानयुगे घेत आली

आहे. धार्मिक अधार्मिक अशा दोन्ही प्रवृत्तीच्या व्यक्ती–व्यक्तीमध्ये ईश्वर विषयक चिंतन चालू असते ईश्वर नाही अशी भूमिका घेणारे व्यक्ती ईश्वर विषयक सांप्रदायिक भूमिकेला विरोध करताना दिसते. मानवी संस्कृतीच्या इतिहासात ईश्वरी कल्पनेचे अधिष्ठान प्रभावी ठरले आहे. ज्या ईश्वरामुळे मानवी नीतीला धर्माला संजीवन लाभले त्याच्या नावानेच माणसाने माणुसकीचा बळी दिलेला दिसून येतो.

कार्य संरेखा किंवा प्रबंधाची रूपरेषा

संकल्पित संशोधना अंतर्गत आपणाला भारतीय आस्तिक दर्शने सांख्य न्याय वैशेषिक मीमांसा योग वेदांत यांच्या ईश्वर विषयक चिंतनाचा वैज्ञानिक दृष्टिकोनातून अभ्यास करावयाचा आहे सर्वप्रथम वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे काय? हे स्पष्ट करण्यात येत आहे. तद्वतच ही दर्शने विशेषता सांख्य, न्याय, वैशेषिक, भौतिकवादी असल्याने त्यांच्या ईश्वर विषयक चिंतनाचे स्वरूप कोणते हे स्पष्ट करणे सुद्धा अगत्याचे ठरते. तसेच भारतीय दर्शन परंपरेतील ईश्वर संकल्पनेशी संबंधित असणाऱ्या अनेक संकल्पना पूर्वजन्म, पुनर्जन्म, पाप–पुण्य, मोक्ष, कर्मफल आदी संकल्पना येतात त्याचा उल्लेख व विवेचन प्रस्तुत प्रबंधात करण्यात येणार आहे.

तदनंतर न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, मीमांसा, वेदांत या मतातील ईश्वराविषयीचे मत मांडून त्याचे चिकित्सक परीक्षण वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये करण्यात येणार आहे. कोणत्याही दर्शनातील विविध विषया बद्दलची प्रतिपादने ही त्या त्या दर्शनाने अतिभौतिकिय आणि ज्ञानमिमांसिय भूमिका तपासून त्यांच्या ईश्वराविषयीच्या मताचे समीक्षण करण्यात येणार आहे. प्रबंधाच्या उत्तरार्धात आस्तिक दृष्टिकोनातून ईश्वरविषयक मतांचे समीक्षण वैज्ञानिक दृष्टिकोनातून करून ते कसे वैज्ञानिक मान्यतेशी जुळणारे आहे.

हे दाखवून आपण स्वीकारलेले सिद्धांत कल्पना सिद्ध करण्याचा प्रयत्न करणार आहे.

सिद्धांत कल्पना किंवा गृहीत कृत्य

भारतीय आस्तिक दर्शने ही वेदप्रामान्य मानणारी असतील तरी या दर्शनामध्ये 'ईश्वर' संकल्पनेचा स्वीकार करीत असताना न्याय दर्शन सोडून इतर सर्व दर्शनानी ईश्वराला दुय्यम स्थान दिले आहे. सांख्य दर्शनकार जगताचे कारण म्हणून प्रकृतीचे अस्तित्व मान्य करतात ते ईश्वराला जगाचे कारण मानत नाहीत. योगदर्शनातील ईश्वर चित्ताला प्रसन्न करणारा समाधीसाठी सहाय्यक ठरणारा परंतु तो जगाच्या उत्पत्तीचे कारण नाही किंवा जगदोत्पत्तीशी त्याचा काहीही संबंध नाही. न्यायदर्शनातील ईश्वर मात्र जगाचा कर्ता, नियंता आहे. मात्र न्याय दर्शनकार असे म्हणतात की तोही जिवात्म्याप्रमाणे एक व्यक्ती आहे. वैशेषिक दर्शनात मर्यादित अर्थानेच ईश्वराचे विवेचन आले आहे प्राचिन मीमांसक निरिश्वरवादी होते. मात्र नंतरच्या काळात यज्ञकर्मामध्ये ईश्वराच्या नावाने यज्ञ केले तर फलप्राप्ती होते एवढ्याच मर्यादित अर्थाने ईश्वर स्वीकारला आहे. शंकराचार्याने ब्रह्म तेवढेच सत्य मानले आहे. ईश्वराचे अस्तित्व केवळ व्यवहारिक जगापुरते मर्यादित ठेवले आहे. या संदर्भात आपली सिद्धांतकल्पना किंवा गृहीतक पुढील प्रमाणे आहे. भारतीय आस्तिकदर्शनात ईश्वर संकल्पनेचा पूर्णतः स्वीकार केलेला नसून मर्यादित अर्थाने त्याचा स्वीकार करण्यात आला आहे.

संशोधनाची व्याप्ती

प्रस्तुत संशोधन भारतीय आस्तिक दर्शनापुरतेच म्हणजेच सांख्य–योग, न्याय–वैशेषिक, मीमांसा–वेदांत पुरते मर्यादित आहे. या दर्शनातील

अतिभौतिक 'तत्व मिमांसिय' आणि 'ज्ञान शास्त्रीय' भूमिकांचा सुद्धा अंतर्भाव संशोधन व्याप्तीच्या कक्षेत करण्यात येणार आहे. असे अध्ययन करताना भारतीय अवैदिक दर्शने आणि पाश्चात्य तत्त्व चिंतनातील मतांचा यथानुरूप उल्लेख करणार आहे.

संशोधन पद्धती

संशोधन कार्य करताना प्रामुख्याने चिंतनात्मक विश्लेषणात्मक आणि क्वचित प्रसंगी तुलनात्मक पद्धतीचा वापर करणार आहे.

शोध प्रबंधातील प्रकरण रूपरेषा

प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करताना खालील पाच प्रकरणांची मांडणी करणार आहे या प्रत्येक प्रकरणांची रचना खालील प्रमाणे करणार आहे.

प्रकरण पहिले प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणा मध्ये संशोधन शीर्षकाचे स्पष्टीकरण करणार आहे. या प्रकरणांमध्ये भारतीय दर्शनाचे स्वरूप आणि भारतीय दर्शनातील ईश्वर विषयक संकल्पनेचे महत्त्व स्पष्ट करणार आहे. 'ईश्वर' संकल्पनेचा अर्थ व व्युत्पत्ती सविस्तर स्पष्ट करणार आहे. तसेच भारतीय दर्शनकारांचे ईश्वर विषयक चिंतन सविस्तर देणार आहे. या प्रकरणांमध्ये संशोधनाची उद्दिष्टे, व्याप्ती, संशोधन पद्धती, संशोधनाचे महत्त्व, सिद्धांत कल्पना आणि नियोजित प्रकरणाची रूपरेषा ही सविस्तर पद्धतीने स्पष्ट करणार आहे.

प्रकरण दुसरे सांख्य–योग

प्रस्तुत प्रकरणात सांख्य–योग दर्शनात करण्यात आलेल्या ईश्वर विषयक विचारांचा समीक्षात्मक दृष्टिकोनातून विचार करणार आहोत. व त्याचा परामर्श घेणार आहोत. सांख्य–योग यांनी ईश्वर तत्व कशा पद्धतीने स्वीकारले याचा अभ्यास करताना त्याचा वैज्ञानिक दृष्टिकोन लक्षात घेऊन त्याचे भौतिकवादी स्वरूप या प्रकरणात स्पष्ट करणार आहे.

तिसरे प्रकरण न्याय–वैशेषिक

तिसऱ्या प्रकरणात न्याय–वैशेषिक दर्शनातील ईश्वरा संबंधीच्या दृष्टिकोनाचा अभ्यास करणार आहे. न्याय–वैशेषिक दर्शनाने ईश्वर मानला आहे त्याचे स्वरूप कसे आहे. याचा वैज्ञानिक दृष्टिकोनातून अभ्यास करणार आहे.

प्रकरण चौथे मीमांसा–वेदांत

प्रस्तुत प्रकरणात मीमांसा–वेदांत याचा ईश्वरासंबंधीच्या दृष्टिकोनाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

निष्कर्ष किंवा उपसंहार

मार्गदर्शक

डॉ. सुनील साळुंखे
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख,
दयानंद कला महाविद्यालय लातूर

संशोधक

दिवे वैशाली माधवराव

संदर्भ ग्रंथसूची

१) कोश

१. दाते - कर्वे — महाराष्ट्र शब्दभाषा कोश (भाग -१) १९८८

२. जोशी, लक्ष्मण शास्त्री — मराठी विश्वकोश (खंड २, ५) महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई १९७६ (खंड १५, १९९५)

३. जोशी, ग. ना. — भारतीय तत्वज्ञानाचा बृहद् इतिहास (खंड १, २, ३) शुभदा सारस्वत प्रकाशन पुणे वर्ष - १९९४

४. जोशी,महादेव शास्त्री — भारतीय संस्कृती कोश (खंड - ३) भारतीय संस्कृती कोश मंडळ, पुणे प्रथमावृत्ती - १९६५

५. जोशी,महादेव शास्त्री — भारतीय संस्कृती कोश कोशमंडळ

६. वाडेकर, दे. द. — मराठी तत्वज्ञान महाकोश, मराठी तत्वज्ञान महाकोश मंडळ, पुणे १९७४

२) ग्रंथ -

१. आठवले, सदाशिव — चार्वाकाचा इतिहास आणि तत्त्वज्ञान,

२. ॲल्फ्रिड ज्युल्स एयर (अनु.डॉ.शि.स. अंतरकर) — भाषा, सत्य आणि तर्क, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे (१९७४)

३. पडोळे, ज्ञा.स. — तीर्थंकर महावीर, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८५ प्रज्ञा पाठशाळा मंडळ (वाई) सातारा, १९५८

४. पं.जोग, द. वा. — भारतीय दर्शन संग्रह (सपरिक्षण) चित्रशाळा प्रकाशन, पुणे (१९५८)

५. मून, वंसत — बुध्द धम्मातील अनात्मवाद, सुगावा प्रकाशन, पुणे, १९८५

६. मोरे, मा.श. — बुध्द धम्माचे मुळ सिध्दांत, कौशल्य प्रकाशन, २०13

७.	रायशेनबाख, हान्स (अनु. कुंभोजकर ग.वि.)	वैज्ञानिक तत्त्वज्ञानाचा उदय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९७३
८.	रॉय, मानवेंद्रनाथ	जडवाद, कॉनिटनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८५
९.	रॉय,मानवेंद्रनाथ बुध्दि, (अनु. सुठंणकर बा.र.)	प्रेरणा आणि क्रांती, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९६८
१०.	चव्हाण, रा.ना.	गौतम बुध्द आणि त्यांचे बौध्द दर्शन, प्रतिष्ठान अक्षर श्रध्दांजली, २०११
११.	डांगे, सिंधु	जैन धर्माचे तत्वज्ञान, महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ नागपूर, प्रथमावृत्ती १९८०
१२.	डांगे, सिंधु	बौद्ध धर्माचे तत्वज्ञान, महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ नागपूर, प्रथमावृत्ती १९८०
१३.	दिक्षित, श्री.ह.	भारतीय तत्त्वज्ञान, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००६.
१४.	हिरीयण्णा (अनु. भ. ग. केतकर)	भारतीय तत्वज्ञानाची रुपरेषा कुलसचिव पुणे विद्यापीठ १९७९
१५.	देशमुख, भाई किशन	विवेकवादी बहस्थती चार्वाक, सम्यक समता प्रकाशन, किशनराव, अहमदपूर, २०१५
१६.	जोशी, ज.र.	थेरवाद बौध्ददर्शन, सुगावा प्रकाशन, पुणे, २००९
१७.	वैद्य, पा.ल.	बौध्द धर्माचा अभ्यदय आणि प्रसार, प्रज्ञा पाठशाळा मंडळ, वाई, १९९५
१८.	बट्रोन्ड, रसेल (अनु. कुवाडेकर वि.वा.)	धर्म आणि विज्ञान, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९७३
१९.	हाडेकर डी. वाय.	बुद्धाचा भौतिकवाद, सुगावा प्रकाशन, पुणे (१९९६)
२०.	साळुंखे, आ.ह.	आस्तिकशिरोमणी चार्वाक, लोकायत प्रकाशन, सातारा, द्वि. आवृत्ती, १९९८

२१. कुमठेकर, उदय — वेध चार्वाकाचा, अभय प्रकाशन, नांदेड, २००८

२२. गाडगीळ, स. रा. — लोकायत, लोक वाङ्मय गृह, मुंबई प्रथमावृत्ती (१९७४)

२३. गायधने, सुरेंद्र — तत्तवज्ञानाची रुपरेषा, महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद, २००९

२४. गोखले, प्रदिप — तत्त्वचिंतक चार्वाक, मनोविकास प्रकाशन, पुणे, २०1३

२५. कवी, माधवी — भारतीय नीतिशास्त्र, स्वाती प्रकाशन, पुर्णा, २००४

२६. तर्कतीर्थ,लक्ष्मण शास्त्री — लेखसंग्रह (खंड १) श्री विद्या प्रकाशन प्रथमावृत्ती (१९८१)